महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.५/ २२३३४
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahdiscom.in

दिनांक : १९.०९.२०१८

# परिपत्रक

**विषय :-** सांघिक कार्यालयास करण्यात येणारा अनावश्यक पत्रव्यवहार टाळणेबाबत.

-------------

महावितरण कंपनी अंतर्गत मानव संसाधन विभागाच्या कामकाजाबाबत सक्षम अधिकाऱ्यांकडून घेण्यात आलेले निर्णय प्रशासकीय परिपत्रक/ परिपत्रक स्वरूपात प्रसारीत करण्यात येतात तसेच तत्कालीन म.रा.वि. मंडळाच्या कार्यकालात घेण्यात आलेले निर्णय हे विविध स्वरूपात म्हणजेच सामान्य आदेश, सर्वसाधारण स्थायी आदेश, प्रशासकीय परिपत्रक, विभागीय परिपत्रक आणि परिपत्रक स्वरूपात प्रसारीत करण्यात आलेले आहेत. सदर आदेश/ परिपत्रकानुसार मानव संसाधन विभागाकडील विविध विषयांबाबत करावयाच्या कार्यवाही बाबत सविस्तर आणि स्वयंस्पष्ट मार्गदर्शन करण्यात आलेले आहे तसेच काही विषयांबाबत क्षेत्रिय कार्यालयातील संबंधीत अधिकाऱ्यांना विविधप्रकारचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. व सदरच्या तरतुदी मूळ स्वरूपात/ वेळोवेळी सुधारीत करण्यात आल्याप्रमाणे आजही अस्तित्वात असून संबंधीत अधिकारी/ कर्मचारी यांना लागू आहेत.

२. तथापि, सद्यस्थितीत असे निदर्शनास आलेले आहे की, उपरोक्त माध्यमातून स्पष्ट तरतुदी करण्यात आलेल्या असतांना देखील, क्षेत्रिय कार्यालयांकडून मानव संसाधन विभागातील विषयांबाबत कार्यवाही करीत असतांना, सांघिक कार्यालयाकडे वारंवार अनावश्यक मार्गदर्शन मागविले जाते, त्यामुळे संबंधीत कर्मचाऱ्यांचे प्रश्न निकाली काढण्यात प्रशासकीय दिरंगाई होत आहे, परिणामस्वरूप कर्मचाऱ्यांच्या तक्रारींमध्ये वाढ होत असून याबाबत कामगार संघटनांकडून क्षेत्रिय कार्यालय तसेच सांघिक कार्यालय स्तरावर तक्रार निवारणासाठी प्रश्न उपस्थित केले जातात.

३. यास्तव सर्व क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात येते की, मानव संसाधन विभागातील संबंधीत विषय हे ज्या सक्षम अधिकाऱ्यांच्या अधिकार क्षेत्रात येतात त्यांनी त्यांचे स्तरावर नियमांचे/ तरतुदींचे अवलोकन करून कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न तात्काळ निकाली काढावेत, जेणेकरून वरीलप्रमाणे होणारी दिरंगाई टाळणे शक्य होईल. तसेच वर नमूद केल्याप्रमाणे मार्गदर्शनासाठी अनावश्यक पत्रव्यवहार करणाऱ्या मानव संसाधन विभागातील संबंधीत अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४. सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

चंद्रशेखर
( चंद्रशेखर येरमे )
कार्यकारी संचालक (मासं)

D:\O&M - May 2017\Circular unnecessary correspondence.docx